Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य / महत्वाचे / तातडीचे

क्र.रा.मं. / परीक्षा–६ / ४५१
पुणे–४११ ००४
दिनांक ०२ / ०२ / २०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२६ दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रवेशपत्र (Hall Ticket) दुरुस्तीबाबत

संदर्भ– १. या कार्यालयाचे जा.क्र.–रा.मं. / परीक्षा–६ / ३६९७, दि.३१.१०.२०२५ रोजीचे पत्र
२. या कार्यालयाचे जा.क्र.–रा.मं. / परीक्षा–६ / ३९४६, दि.१७.११.२०२५ रोजीचे पत्र
३. दिनांक ०२ / ०२ / २०२६ रोजी V.C. मध्ये दिलेली सूचना

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२६ दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांच्या सुधारित तारखा संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात आल्या होत्या.

| अ. क्र. | विषय सांकेतांक | विषयाचे नाव | कालावधी | | सत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | जे १ | घरगुती विदयुत उपकरणे / Electrical Domestics Appliances | शुक्रवार | २० / ०३ / २०२६ | दुपार |
| २. | जे ५ | दूध व दूधाचे पदार्थ / Milk And Milk Product | सोमवार | २३ / ०३ / २०२६ | दुपार |
| ३ | जे ९ | हस्तभरतकाम / Hand Embroidery | मंगळवार | २४ / ०३ / २०२६ | दुपार |
| ४ | के १ | शिवणयंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती / Stiching with Sewing Machine and its Repairing And Maintenance | बुधवार | २५ / ०३ / २०२६ | दुपार |
| ५ | के ५ | टाकाऊ वस्तूपासून सौंदर्याकृती / Preparation of Decorative pieces by utilization of waste material | शुक्रवार | २७ / ०३ / २०२६ | दुपार |
| ६ | एल ७ | पाककला / Cookery | शनिवार | २८ / ०३ / २०२६ | दुपार |
| ७ | एम ३ | भारतीय संगीत (गायन–वादन) / Indian Music (Vocal & Instrumental ) | सोमवार | ३० / ०३ / २०२६ | दुपार |
| ८ | एम ६ | चित्रकला व रंगकाम / Drawing and Painting | बुधवार | ०१ / ०४ / २०२६ | दुपार |
| ९ | एम ७ | कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी / Paperwork, Cardboard work and Bookbinding | गुरुवार | ०२ / ०४ / २०२६ | दुपार |

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रामध्ये कार्यशिक्षण विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या तारखा संदर्भिय क्र.१ च्या पत्रानुसार आलेल्या आहेत.

तरी फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट दिव्यांग विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावर (Hall Ticket) कार्यशिक्षण विषयांच्या पेपरच्या तारखा मंडळाच्या अंतिम छपाई वेळापत्रकाप्रमाणे दुरुस्त करुन देण्याबाबत सर्व संबंधित शाळांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे. सर्व संबंधित दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रवेशपत्र (Hall Ticket) दुरुस्त करुन देण्याची दक्षता संबंधित शाळा मुख्याध्यापकांनी घ्यावयाची आहे. त्याअनुषंगाने सर्व संबंधित दिव्यांग विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे (Hall Ticket) दुरुस्त होतील याची खात्री विभागीय मंडळाने करावी व कोणताही दिव्यांग विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

तरी याबाबत उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळ कार्यालयास सादर करावा.

Mali,

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४

प्रत माहितीस्तव–
गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे–०४